
'राईज' या मोहिमेंतर्गत सोमवारी काढलेल्या रॅलीदरम्यान महिलांवरील अत्याचाराविरोधात जनजागृती करण्यासाठी पथनाट्य करताना महाविद्यालयीन विद्यार्थी.

# महिलांवरील अत्याचाराविरोधात आवाज उठवा

## 'निर्भया'वरील बलात्काराच्या घटनेला वर्ष झाल्यानिमित्त विद्यार्थ्यांची रॅली

**सकाळ वृत्तसेवा**

मुंबई, ता. १६ : मुंबईसारख्या महानगरांतही स्त्रियांवर अत्याचार होत आहेत. समाजात नालस्ती नको, म्हणून अनेकदा महिला गप्प बसतात. परिणामी असे कृत्य करणाऱ्यांचे फावते. त्यामुळे स्त्रियांनी मौन सोडून या अत्याचाराविरोधात वाचा फोडली पाहिजे, असा संदेश मुंबईतील महाविद्यालयीन तरुणांनी आज शहरात ठिकठिकाणी रॅली काढून दिला.

दिल्लीत 'निर्भया'वर झालेल्या सामूहिक बलात्काराच्या घटनेला आज एक वर्ष झाले. त्यानिमित्त स्त्रियांवरील अत्याचाराविरोधात आवाज उठवला पाहिजे, असा संदेश देण्यासाठी 'मेन्स अगेन्स्ट वॉयलन्स अँण्ड अब्युज' (मावा) या संघटनेने 'राईज' ही मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेत आज शहरातील पंचवीसहून अधिक महाविद्यालयांतील तीन हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

या मोहिमेंतर्गत सकाळी ९ वाजल्यापासून ग्रॅन्ट रोड, दादर, माटुंगा, सांताक्रूझ आदी भागांत रॅली काढण्यात आली. त्या दरम्यान सात महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी स्त्रियांवरील अत्याचाराविरोधात जनजागृती करण्यासाठी पथनाट्ये सादर केली. स्त्रियांकडे वाईट नजरेने पाहू नका, त्यांच्यावर शेरेबाजी करू नका, स्त्री समाजातील एक महत्त्वाचा घटक आहे, तिचा आदर करा, स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराला विरोध करा, असा संदेश या पथनाट्यांतून देण्यात आला. या वेळी स्त्रियांवरील अत्याचाराविरोधात जनजागृती करणारी पोस्टर्सही विद्यार्थ्यांनी लावली. या रॅलीदरम्यान मुलांनी 'मी अत्याचार करणार नाही', तर मुलींनी 'मी अत्याचार सहन करणार नाही' अशी शपथ घेतली, अशी माहिती 'मावा'चे हरीश सदानी यांनी दिली.